ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती

**प्रा. किरण नाईकनवरे**

*श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे ५२*

*ईमेल आयडी: kiran.naiknaware@siddhivinayakcollege.org*

**गोषवारा**

*भारतीय समाजात स्त्रियांच्या प्रश्नांची सुरुवात त्यांच्या जन्मापासूनच होते. कारण आजही भारतीय समाजात मुलीचा जन्म ही फारशी आनंदाची गोष्ट मानली जात नाही. विवाहापूर्वी बालपण, शिक्षण आणि आरोग्य या सर्व बाबींच्या बाबतीत भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. तर स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या या दुय्यमत्वाच्या स्थितीत विवाहानंतरही फारसा बदल होत नाही. कुटुंब, विवाह, समाज, शिक्षण, कामाचे ठिकाण अशा सर्वच क्षेत्रात स्त्रियांना मिळणारी वागणूक पाहता त्यामध्ये भेदभाव, कनिष्ठता, दुय्यमत्व सर्वाधिक व सर्वत्र आढळून येते. आधुनिक औद्योगिक समाज व्यवस्थेत एका बाजूला स्त्रियांची प्रगती दिसत असली तरी दुसऱ्या बाजूला स्त्रियांच्या हजारो समस्या आढळतात. प्रारंभीपासूनच भारतीय समाजात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा वेगळा आहे. त्याचा अनुभव आपण दैनंदिन जीवनात घेत आहोतच. आज स्त्रियांच्या परंपरागत दर्जेत व भूमिकेत अनेक सकारात्मक बदल झालेले आहेत, त्यांना राज्यघटनेच्या माध्यमातून समान हक्क व अधिकार मिळाले आहेत, सर्व क्षेत्रात स्त्रिया या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून यशस्वीरित्या कार्य करत आहे. हे जरी खरे असले तरीही त्यांच्यावरील अन्याय आणि अत्याचार हे पूर्णपणे संपले असे कोणालाही म्हणता येणार नाही. कारण भारतीय समाज व्यवस्थेत पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना कायमच दुय्यमत्व प्रदान केल्याची वास्तविकता आहे.*

*भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण होत असले तरीही भारतीय समाजात स्त्रियांना मिळणारा सन्मान व दर्जा निश्चितच गौरवशाली नाही. स्त्रियांचे कार्यक्षेत्र कुटुंब, चूल आणि मूल यापुरतेच मर्यादित असावे; हा भारतीय समाज व्यवस्थेतील परंपरागत दृष्टीकोन त्यांच्या या अवस्थेला कारणीभूत आहे. मग शहरी समाज असो, ग्रामीण समाज असो किंवा आदिवासी समाज असो. प्रत्येक समाजात आपल्याला स्त्रियांच्या समस्या आढळतात. भारतीय समाज व्यवस्थेत शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागांत स्त्रियांच्या समस्या अधिकच गंभीर स्वरूपाच्या आहेत. भूमिहीन मजूर, शेत मजूर, बलुतेदार, छोटे मोठे शेतकरी, जमीनदार यांच्या प्रत्येक कुटुंबात स्त्रियांच्या समस्यांचे स्वरूप अधिक गंभीर आहे. मग ती स्त्री विवाहित असो, अविवाहित असो, विधवा असो, वृद्ध असो, घटस्फोटीत असो किंवा परित्यक्ता असो. प्रत्येक स्त्रीला जीवन जगताना अनेक प्रकारच्या आव्हांना सामोरे जावे लागते. परंतु इतर स्त्रियांच्या तुलनेत ग्रामीण भारतात विधवा स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय आहे. कारण मुळातच भारतीय समाज व्यवस्थेत पुरुषाशिवाय स्त्रीचे संपूर्ण जीवनच व्यर्थ आहे किंवा पतीशिवाय त्या स्त्रीच्या जीवनाला कोणताही अर्थ नाही असे मानले जाते. त्यामुळे भारतीय समाजात विधवांना उपेक्षा आणि तिरस्काराचा सामना अधिक प्रमाणात करावा लागतो. विशेषतः ग्रामीण विधवांना नव्याने आयुष्य सुरू करण्याच्या संधी खूपच कमी प्रमाणात मिळतात. शासनाकडून विधवांना आर्थिक मदत देखील पुरेशा प्रमाणात मिळत नाही. अंधश्रद्धा, अज्ञान, शैक्षणिक मागासलेपणा, दारिद्र्य, वाढते वय, आजारपण, मानसिक आधाराचा अभाव, परावलंबन हे दृश्य तर ग्रामीण भारतात सातत्याने आढळते आहे. अशा तऱ्हेने भारतीय समाजात ग्रामीण विधवा स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक अशा अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते.*

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

**बीज संज्ञा :** *ग्रामीण, विधवा, सामाजिक, आर्थिक, समस्या*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना**

भारत हा पुरुषप्रधान देश आहे. भारतीय समाजाचा प्राचीन काळापासून ते आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, भारतीय समाजात स्त्रियांच्या स्थितीत अनेक प्रकारचे चढ-उतार झालेले आहे. भारतीय समाज व्यवस्थेत रुजू असलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रिया या सर्वच क्षेत्रात कायमच दुर्लक्षित, वंचित व दुय्यम राहिल्या आहेत व विविध प्रकारच्या सामाजिक बंधनात त्या अडकल्या गेल्या आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण, पाश्चीमात्यीकरण, शिक्षणाचा प्रसार, व्यक्तिवादी विचारसरणी अशा अनेक घटकांच्या प्रभावामुळे भारतीय समाजात अनेक प्रकारचे अमुलाग्र परिवर्तन झाले. मात्र स्त्रियांच्या स्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाही. २१ व्या शतकातही स्त्रियांना अनेक प्रकारच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. लहान मुलींपासून ते वृद्ध स्त्रिया आणि विवाहित स्त्रियांपासून ते एकल स्त्रिया अशा सर्वच स्तरांतील स्त्रियांना वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. विधवा स्त्रियांचा प्रश्न भारतामध्ये अचानकपणे आताच उद्भवलेला नाही. तर वर्षानुवर्षे भारतीय समाजात विधवांचे प्रश्न अस्तित्वात आहे. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह, केशवपन, पुनर्विवाह बंदी यांसारख्या अनेक जाचक व अन्यायकारक चाली-रितींनी तर स्त्रियांचे आयुष्यच उध्वस्त करून टाकले.

आजही भारतीय समाजव्यवस्थेत विधवांचे प्रश्न अतिशय गंभीर स्वरूपाचे असलेले आढळतात. कारण भारतीय समाजात पतीच्या निधनानंतर त्याच्या विधवेला नव्याने आयुष्य सुरू करण्याची संधी खूपच कमी प्रमाणात मिळते. तसेच विधवांची स्थिती ही भारतीय समाजात मुळातच सहजासहजी स्वीकारली जात नाही. परिणामी भारतीय समाजात विधवांची स्थिती अतिशय दयनीय झालेली आढळते. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागांत विधवा स्त्रियांना अनेक प्रथा-परंपरा व चालीरीतींना अनुसरून वैधव्याची जाणीव करून दिली जाते. कुटुंबात व समाजात असलेला कनिष्ठ दर्जा, आर्थिक शोषण, शासकीय योजनांच्या लाभांचा अभाव, आरोग्यविषयक समस्या, मुलांचे संगोपन, मुलांचे शिक्षण, कर्ज, घराचा प्रश्न, एकेरी पालकत्वाचे आव्हान, अनिष्ट रूढी, परंपरा व चालीरीती यांमुळे होणारा सामाजिक भेदभाव, मानसिक ताण तणाव अशा सर्वच बाबींच्या संदर्भात ग्रामीण विधवांचा संघर्ष चालू असतो. परिणामी ग्रामीण विधवा स्त्रियांना स्वातंत्र्य, सन्मान आणि स्वहितासाठी आजच्या काळातही झगडावे लागत आहे. काळानुसार व परिस्थितीनुसार विधवांच्या स्थितीत अनेक महत्त्वाचे बदल झाले आहेत. मात्र भारतीय समाजात ग्रामीण विधवांच्या स्थितीत फारसे बदल झालेले दिसून येत नाही. आजही भारतात ग्रामीण विधवा या उपेक्षितांचे जीवन जगताना आढळतात. विशेषतः या ग्रामीण विधवा स्त्रियांचे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक प्रश्न आणखीच वेगळे आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयात भारतातील ग्रामीण विधवांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन त्यांच्या समस्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पद्धती**

'भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती' या विषयावरील शोध निबंधासाठी पुढीलप्रमाणे संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

'भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती' या विषयावरील शोध निबंधासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे मांडली आहेत-

- विधवा या संकल्पनेचा आढावा घेणे.

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

- परंपरागत भारतीय समाजात विधवांच्या स्थितीचा आढावा घेणे.
- भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती अभ्यासणे.
- भारतातील ग्रामीण विधवांच्या समस्यांचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतके**

'भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती' या विषयावरील शोध निबंधासाठी खालीलप्रमाणे गृहीतके मांडली आहेत.

- भारतातील ग्रामीण विधवांना वैयक्तिक व सामाजिक जीवनात अधिक प्रमाणात संघर्ष करावा लागतो.
- सद्यस्थितीत भारतातील ग्रामीण विधवांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

**माहितीचे स्त्रोत**

'भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती' या विषयावर संशोधन करताना माहिती संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. वर्तमान पत्रे, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

**विधवा**

- ज्या स्त्रीच्या पतीचे निधन झाले आहे व तिने पुन्हा विवाह केलेले नाही, अशी स्त्री म्हणजे 'विधवा' होय.
- विधवा म्हणजे अशी स्त्री जिच्या जोडीदाराचा अथवा पतीचा मृत्यू झाला आहे.

प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात विवाह अत्यंत महत्त्वाचा व अनिवार्य मानला गेला आहे. विवाहानंतर स्त्री आपले माहेर सोडून आपल्या पतीच्या घरी येते. पतीमुळेच त्या स्त्रीला कौटुंबिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा लाभते. मात्र पती व पत्नी यांचे वैवाहिक जीवन हे त्यांच्यापैकी एका व्यक्तीच्या मृत्यूमुळे संपुष्टात येते. पुरुषप्रधान समाज व्यवस्था, धार्मिक चालीरीती व रूढीचा प्रभाव असलेल्या भारतीय समाजामध्ये पतिच्या निधनानंतर स्त्रीला वैधव्य येऊन ती भावनिक, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उपेक्षित होते व एकाकी पडते. तिचे संपूर्ण आयुष्य विशिष्ट नीति नियमांनी नियंत्रित केले जाते व काटेकोर रूढी-परंपरा व बंधने यांनी बंदिस्त होते.

**परंपरागत भारतीय समाजात विधवांची स्थिती**

पुरुष प्रधान भारतीय समाजात स्त्रियांना कायमच दुय्यम दर्जा देण्यात आला. अशा पुरुषप्रधान भारतीय समाजात विवाहित स्त्रीने पतीच्या अधिकारात राहावे व पतीशी कायम एकनिष्ठ राहावे. फक्त पतीच्या हयातीतच नाही तर पतीच्या मृत्यूनंतरही तिने पतिव्रत पाळावे, पतीच्या स्मरणार्थ आजन्म व्रतवैकल्य करून जीवन जगावे, पुनर्विवाह करू नये असे जाचक निर्बंध होते. अशा परंपरागत भारतीय समाजात विधवा स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप हे बालविवाह, बाला जरठ विवाह, सतीप्रथा, केशवपन, पुनर्विवाह बंदी अशा अनेक अनिष्ट चालीरीतींशी निगडित होते. पतीच्या निधनानंतर त्याच्या विधवेने पुन्हा विवाह करू नये, पांढऱ्या रंगाचे वस्त्र वापरावे, शृंगार करू नये, केशवपन करावे, ठराविक वेळेत ठराविक आहार घ्यावा, घराबाहेर जाऊ नये, घरातील सर्व कामे करावी, कौटुंबिक-सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊ नये, अशा प्रकारचे निर्बंध त्यांच्यावर लादण्यात आले. कुटुंबात व समाजात त्यांना कोणत्याही प्रकारचा मान-सन्मान नव्हता. या अनिष्ट चालीरीती व जाचक निर्बंधांमुळे विधवा स्त्रिया गुलाम म्हणून अतिशय दयनीय, हलाखीचे व व भेदभावपूर्ण जीवन जगत होत्या. परिणामी अशा प्रकारच्या अनेक जाचक निर्बंधांमुळेच परंपरागत भारतीय समाजात विधवा स्त्रियांच्या समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

जोतीराव फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या अनेक समाज सुधारकांनी विधवांच्या समस्यांना वाचा फोडली. केशवपनासारख्या अघोरी चालीविरुद्धह लढा दिला. सतीच्या अमानुष चालीविरूद्ध चळवळ उभी करून सतीप्रथेवर बंदी घालण्यात आली. विधवा पुनर्विवाहासाठी प्रयत्न केले. विधवांना त्यांचे हक्क प्रदान करणारे अनेक कायदे संमत केले गेले.

**भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती**

कोणत्याही समाजात एखाद्या स्त्रीच्या पतीचे निधन होणे ही तिच्या आयुष्यात फार मोठी दुर्दैवी आपत्ती ठरते. कारण पतीच्या निधनामुळे त्या स्त्रीचे संपूर्ण आयुष्यच बदलून जाते. अशा वेळी त्या स्त्रीच्या वाट्याला वैधव्यासोबत एकाकी आणि परावलंबी जीवन येते. मुळातच भारतीय समाजात विधवा या वर्षानुवर्ष अंधकारमय जीवन जगत आहेत. पुरुषप्रधान व्यवस्थेने विधवांवर अनेक प्रकारची बंधनेही लादली आहेत. ग्रामीण भागात तर विधवांचा दर्जा अतिशय खालावलेला दिसून येतो. त्यांना व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात अनेक प्रकारच्या आव्हांना सामोरे जावे लागते. कारण समाजाचा विधवांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजूनही दुषित स्वरूपाचा आहे. पती नसल्यामुळे त्यांना अपमानित जीवन जगावे लागते. शिवाय कुटुंबातून, कुटुंबातील इतर पुरुषांकडून व समाजाकडून त्यांच्यावर विविध मार्गांनी नियंत्रण ठेवण्याचा आणि त्यांच्यावर सत्ता गाजवण्याचा देखील प्रयत्न केला जातो. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत या ग्रामीण विधवांना भेदभाव, एकाकीपणा, परावलंबत्व, छळ व शोषण अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

ग्रामीण भागात स्त्रिया आपल्या पतीच्या निधनानंतर मंगळसूत्र, जोडव्या, हिरव्या बांगड्या घालत नाही. कपाळावर कुंकू लावत नाही, केसांत गजरा माळत नाही, चांगले कपडे नेसत नाही, शृंगार करत नाही, हाताला मेहंदी लावत नाही, कोणतेही सण-उत्सव साजरे करत नाही. बहुतांश वेळेला समाजाकडून व कुटुंबाकडून पतीच्या निधनाचा संपूर्ण दोष तिच्यावर टाकून तिला कायम समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर केले जाते. लग्न कार्यात, कौटुंबिक धार्मिक कार्यक्रमात त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. विधवांनी समाजात व कुटुंबात वावरताना कसे वागले पाहिजे, कसे बोलले पाहिजे, कसे राहिले पाहिजे अशा सर्व गोष्टींवर नियम लावले जातात. त्यांच्या प्रत्येक गोष्टीवर, हालचालींवर बंधने लादली जातात. पतीच्या निधनाने खचलेल्या स्त्रीला सामाजिक प्रथा-परंपरांच्या नावाखाली आणखीन मानसिक दृष्ट्या दुबळी केली जाते. भारतात असंख्य ग्रामीण विधवा अशाच प्रकारचे निराश, उपेक्षित व दयनीय जीवन जगत आहेत. सध्या भारतीय समाजात विधवांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. कारण भारतीय समाजात विधवांच्या पुनर्विवाहाचे प्रमाण हे अजूनही कमी आहे. भारतीय समाजव्यवस्थेत या विधवांना विकासापासून पूर्णपणे वंचित व उपेक्षित राहूनच जीवन जगावे लागते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात विधवांची संख्या २ कोटी ९२ लाख इतकीआहे. २१ व्या शतकातही भारतीय समाजात ग्रामीण विधवांच्या स्थितीत फारसा बदल झालेला दिसून येत नाही. सोबत या विधवा स्त्रियांना इतर स्त्रियांपेक्षा वेगळी वागणूक देऊन त्यांचा अपमान केला जातो. तसेच आजही या ग्रामीण विधवांचे प्रश्न हे फार चर्चेत नसतात.

**भारतातील ग्रामीण विधवांच्या समस्या**

एखाद्या स्त्रीच्या पतीचे निधन झाल्यास ती स्त्री आपले सर्वस्व गमावून बसते. परिणामी तिला फार मोठ्या प्रमाणात भेदभावपूर्ण परिस्थितीचा सामना करावा लागतो. त्या विधवा स्त्रीला कुटुंब व समाज यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा सामाजिक, आर्थिक, व मानसिक आधार मिळत नाही. अनेक कुटुंबांमधून तर विधवांना स्वीकारले देखील जात नाही. त्यांना त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या वाट्याला मानसिक, आर्थिक, शारीरिक त्रास, सामाजिक अवहेलना आणि दु:ख येत असतेच. सोबत त्यांना उपेक्षा, तिरस्कार, भेदभाव, लैंगिक कुचंबना अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. सद्यस्थितीच्या दृष्टीने भारतीय समाजात ग्रामीण विधवांना जीवन जगत असताना

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

प्रामुख्याने एकाकीपणा, उपेक्षा, दुजाभाव, तिरस्कार, नैराश्य, असुरक्षितता, आर्थिक प्रश्न व भावनिक - मानसिक आव्हांनाना सामोरे जावे लागते. ग्रामीण विधवांच्या समस्या पुढीलप्रमाणे –

**एकाकीपणा**

पतिच्या निधनानंतर स्त्रीचे पूर्णपणे सामाजिक जीवनच उद्धवस्त होते. परिणामी संपूर्ण जीवन एकाकीपणे जगण्याची वेळ त्या विधवेवर येते. त्यांना समाजात वंचितपणे जगावे लागते. बहुतांश वेळेला कुटुंब किंवा समाजाकडून कोणत्याही प्रकारचा आधार मिळत नाही. एकाकी जीवनाचा त्यांच्या भावनिक व मानसिक आरोग्यावर सखोल परिणाम होतो.

**उपेक्षा**

वैधव्य आल्यानंतर कुटुंबातच नव्हे तर समाजातही विधवांची अधिक प्रमाणात उपेक्षा केली जाते. त्यांना कौटुंबिक व सामाजिक कार्यापासून दूर ठेवले जाते. बहुतांश वेळेला विधवांचा कौटुंबिक, सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी होणे अशुभ मानले जाते.

**भेदभाव**

ग्रामीण विधवांना कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, भावनिक अशा अनेक स्तरांवर भेदभावाचा सामना करावा लागतो. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर लोटले जाते.

**अपमान**

ग्रामीण विधवांना कुटुंबात व समाजात सततची वाईट वागणूक दिली जाते. उठता बसता त्यांचा अपमान केला जातो. त्यांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळविण्यासाठी आणि सन्मानाने जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

**पुनर्विवाहाचे निर्बंध**

बहुतांश कुटुंबांमधून विधवांना पुनर्विवाह करण्याची परवानगी दिली जात नाही. पुनर्विवाह केला तर मुलांवरचा हक्क सोडावा लागेल या भीतीने विधवा पुनर्विवाहा करण्यासाठी फार उत्सुक नसतात. पुरुषप्रधान संस्कृती, विधवांविषयी प्रचलित पारंपरिक मानसिकता यामुळे विधवांना शोषित, दुर्लक्षित व वंचित आयुष्य जगावं लागतं.

**कौटुंबिक प्रश्न**

कुटुंब संस्थेत ग्रामीण विधवांवर अनेक प्रकारची बंधने लादली गेली आहे. यातूनच या ग्रामीण विधवांचे असंख्य कौटुंबिक प्रश्न निर्माण झाले आहेत. विधवांना सासरच्या किंवा माहेरच्या लोकांवर आश्रित राहावे लागते. त्यांना कुटुंबात कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य दिले जात नाही. कुटुंबाची मर्जी सांभाळूनच जगावं लागत. बहुतांश वेळेला विधवा स्त्रियांना कुटुंबात स्वीकारले देखील जात नाही. तर काही वेळेला विधवा कुटुंबात असणे अशुभ मानले जाते. अशा तऱ्हेने विधवा स्त्री कुटुंबापासून दुरावली जाते व तिला एकाकीपणा आणि असुरक्षितता या प्रश्नांशी सामना करावा लागतो. एकाकी जीवन जगत असताना विधवांना कुटुंबातील कर्ता व्यक्ती म्हणून सर्व प्रकारच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. परिणामी त्यांचे जीवन अत्यंत कष्टप्रद बनते.

**सामाजिक समस्या**

मुळातच ग्रामीण भागात स्त्रियांना शिक्षण, रोजगार व कायदेशीर हक्कांची जाणीव कमी असल्यामुळे अनेक प्रकारच्या संकटांची झळ त्यांना सोसावी लागते. त्यामुळे वैधव्य आल्यानंतर या स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय व चिंताजनक बनते. कारण समाजाकडून अशा विधवा स्त्रियांच्या

स्वातंत्र्यावर हल्ला होऊन अनेक प्रकारची जाचक बंधने लादली जातात. त्यांना स्वावलंबी जीवन जगण्याच्या संधी नाकारल्या जातात. पती हयातीत नसल्यामुळे त्यांना फार मोठ्या प्रमाणात अपमानित जीवन जगावे लागते. हळदी-कुंकू, लग्न कार्य, पूजा-सण समारंभ अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. बहुतांश वेळेला अशा कार्यक्रमात सहभागी झाल्या नंतर नातेवाईक काय म्हणतील? याचा विचार करून विधवा स्त्रिया स्वतः त्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे टाळतात. अनेक प्रकारच्या सामाजिक व धार्मिक बंधनांच्या आधारे त्यांना बहिष्कृत केले जाते. पतीचे निधन झाले की त्याच्या विधवेने सर्व सुखसोयींचा त्याग केला पाहिजे अशा नियमांमुळे विधवा स्त्रियाचं जगणं आणखी वेदनादायी आणि अंधकारमय होताना दिसत आहे. अशा असह्य वेदना सहन करत या विधवा स्त्रियांना जगावं लागत. एकूणच दु:खाबरोबर त्यांना कमीपणासुद्धा पत्करावा लागतो.

**आर्थिक समस्या**

ग्रामीण विधवांना सामाजिक प्रश्नांबरोबर आर्थिक प्रश्नांना देखील सामोरे जावे लागते. कारण त्या समाजात व कुटुंबात पूर्णपणे एकट्या ठरतात. अशा एकट्या विधवा स्त्रियांना आपल्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सतत जाणवतो. तसेच मुलांच्या पालन पोषणाची व शिक्षणाची जबाबदारी या विधवा स्त्रियांवर येऊन पडते. जीवनावश्यक गरजा कशा भागवायच्या हा मुख्य प्रश्न या विधवांपुढे आवासून उभा राहतो. आर्थिक व्यवहार या विषयी त्यांना फारशी माहिती नसते. शेतमजुरी करण्यावाचून त्यांना पर्याय नसतो. घरातला दैनंदिन खर्च, मुलांचे शिक्षण, कर्ज, आजारी व्यक्तीचा औषधोपचार अशा अनेक बाबींचा आर्थिक ताण त्यांना अचानकपणे सहन करावा लागत आहे. शासनाच्या कल्याणकारी योजना व पेन्शन योजना यांचे फायदे ग्रामीण भागातील महिलांपर्यंत परिणामकारक रीत्या पोहोचत नाही. आर्थिक दृष्ट्या पुरुषावर अवलंबून नसलेली बाई म्हणून समाजात त्यांची नवीन ओळख निर्माण. बहुतांश वेळेला पतीच्या संपत्तीत वाटा मिळविण्यासाठी देखील त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

**एकल पालक म्हणून निर्माण होणारे प्रश्न**

ग्रामीण विधवा स्त्रिया कुटुंबातील सदस्यांच्या व मुलांच्या जबाबदारीचा गाडा एकट्या रेटत असतात. मुलांसाठी आई-वडील अशा दोन्ही भूमिका त्यांना निभवाव्या लागतात. उदरनिर्वाहा सोबत, मुलांच्या संगोपनाचा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहतो. एकल पालक म्हणून अनेक आव्हानांना त्यांना तोंड द्यावे लागते.

**भावनिक – मानसिक समस्या**

बहुतांश वेळेला कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडत असताना ग्रामीण विधवांना आरोग्य आणि मानसिक ताण तणाव विषयक समस्यादेखील भेडसावत असतात. कारण समाजाकडून त्यांना फार चांगली वागणूक मिळत नाही. कोणत्याही सामाजिक-धार्मिक कार्यक्रमात त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. त्यांची उपेक्षा केली जाते. बहुतांश वेळेला त्यांना एकाकीपणामुळे मानसिक दडपणाचा देखील सामना करावा लागतो. याचा त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर खूप परिणाम होतो. परिणामी विधवा स्त्रियांमध्ये नैराश्याची भावना वाढीस लागते. पतीच्या निधनाचे दु:ख, मुलांच्या पालन पोषणाची व शिक्षणाची जबाबदारी आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न, भविष्याची चिंता अशा अनेक प्रश्नांमुळे या स्त्रिया भावनिक व मानसिक दृष्ट्या ग्रासलेल्या आहेत.

**लैंगिक समस्या**

बहुतांश वेळेला ग्रामीण समाजात कुटुंबातून विधवेला पुनर्विवाह करण्याची परवानगी दिली जात नाही. त्यामुळे ग्रामीण विधवा स्त्रियांना लैंगिक कुचंबणा या अडचणीला तोंड द्यावे लागते. तर काही वेळेला त्यांना घरात व घराबाहेर लैंगिक शोषणाला देखील बळी पडावे लागते.

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

अशा प्रकारे भारतीय समाजात ग्रामीण विधवांना अनेक प्रकारच्या समस्यांना व आव्हानांना सामोरे जावे लागते.

**निष्कर्ष**

भारतीय समाजात ग्रामीण स्त्रियांना विधवा म्हणून जगताना अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, भावनिक-मानसिक, लैंगिक अडचणींचा सामना करावा लागतो. २१ शतकातही विधवा स्त्रियांच्या स्थितीत फारसे परिवर्तन झालेले दिसून येत नाही. कारण भारतीय समाजात अजूनही विधवांना स्वीकारलं जात नाही. कोणत्याही आनंदोत्स्वात त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. अनेक प्रकारची जाचक बंधने त्यांच्यावर घातली जातात. त्यामुळे त्यांचा समाजात असलेला दर्जा कायम कनिष्ठ असलेला दिसून येतो. त्यांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिकच गंभीर रूप धारण करीत आहे. विधवांसाठी शासनातर्फे अनेक कल्याणकारी योजना राबवूनही त्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत. त्यामुळे वैधव्य हा त्या स्त्रीचा दोष नसून तिला समाजात व कुटुंबात समानतेने आणि स्वाभिमानाने जगण्याचा हक्क आणि अधिकार आहे. त्यामुळे विधवांना सामाजिक, आर्थिक, भावनिक व मानसिकदृष्ट्या उभं करणं गरजेचं आहे.

**संदर्भसूची**

१) गंदेवार, एस. एन., भारतातील सामाजिक समस्या, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
२) मालशे, स. गं.; आपटे, नंदा, विधवा विवाह चळवळ (१८००-१९००), मुंबई, १९७८.
३) Dandavate, Pramila; Ranjana kumari; Verghese, Jamila, Widows, Abandoned and Destitute Women in India, Delhi, 1989.
४) डॉ. पाटील लीला, 'भारतीय स्त्री जीवन', मेहता प्रकाशन, पुणे (१९९०)
५) डॉ. परुळेकर आशा, 'आधुनिक स्त्रीच्या समस्या', मेहता प्रकाशन, पुणे (१९९२)
६) Sharma, Vijay, Protection to Women in Matrimonial Home, Delhi, 1994.
७) खडसे, भा. कि., भारतातील सामाजिक समस्या. श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००९.
८) आगलावे,प्रदीप, “सामाजिक संशोधन पद्धती”, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.
९) महाराष्ट्र टाईम्स २३ जून २०१४
१०) जिणे वैधव्याचे.. लोकसत्ता २९ नोव्हेंबर, २०१४.
११) आगलावे, प्रदीप, भारतीय समाज : संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११
१२) झाडबुके साधना, 'एकटीचे दुख, त्यावर उपाय काय? प्रबोधन प्रकाश ज्योती समाजवादी प्रबोधिनी, वर्ष २७, अंक ३४९, इचलकरंजी, २०१६
१३) लोकसत्ता, ६ ऑगस्ट, २०२१
१४) लोकमत, १२ ऑगस्ट, २०२१
१५) महाराष्ट्र टाईम्स, १४ ऑगस्ट, २०२१
१६) सकाळ, ८ फेब्रुवारी, २०२२
१७) https://marathi.thewire.in/issues-and-problems-of-covid-widows

ISSN–2277- 8721

OPEN ACCESS

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

*Original Research Article*

**Cite This Article:**

**प्रा. किरण नाईकनवरे,** ***(2022).*** भारतातील ग्रामीण विधवांची सद्यस्थिती , ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 214-221.*